सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ६१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘वसुली अधिकारी’ झाले ‘वाटप अधिकारी’...

## जिल्हाधिकारी महोदया, पोलीस अधिक्षक साहेब हे चाललयं काय?

**दीपक शेळके**

**जालना -** सण हा मोठा नाही आनंदाला तोटा असा हा दिवाळीचा सण येतांना समृद्धी, सुख, नवचैतन्य घेऊन येत असतो. यंदा मात्र, महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यातल्या त्या शासनाने भली मोठी रक्कम जाहीर केली असली मुळात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असलेली रक्कम तुटपुंजी आहे. त्यामुळे यंदाच्या दिवाळीत अद्यापपर्यंत नेहेमीच्या तुलनेत उल्हास कमी दिसून येत आहे. त्यातल्या त्यात माध्यमांसाठीही ही दिवाळी खास असते. दिवाळीच्या निमित्ताने विविध वृत्तपत्रे हे दिवाळी अंक प्रकाशित करत असतात. त्यात त्यांना राजकीय, सामाजिक, शासकीय, व्यावसायिक, वैयक्तीक अशा जाहिराती प्राप्त होत असतात. असे असले तरी पोलीस खात्यात मात्र, वेगळीच दाळ शिजत असल्याचे लक्षात आले आहे. आणि हे केवळ यंदाच नव्हे तर यापुर्वी देखील अशीच परिस्थिती प्रत्येक दिवाळीला असते अशी प्रतिक्रिया युवा आदर्श बोलतांना अनेकांनी व्यक्त केली आहे. जाहीरात हा वृत्तपत्रांचा कणा असतो. जाहीरातींवरच वृत्तपत्रांचे भविष्य अवलंबून असते. मात्र, पोलीस खात्याकडून जाहीराती न देता पाकीट पद्धत रुढ झाल्याने काही सूज्ञ संपादक मंडळींकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे. जालना शहरातील पोलीस अधिक्षक कार्यालयातील आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय, सदर बाजार पोलीस ठाणे, कदीम जालना पोलीस ठाणे, तालुका पोलीस ठाणे, चंदनझिरा पोलीस ठाणे, महामार्ग पोलीस शाखा यांच्याकडून जाहिरातींऐवजी थेट पाकीट पद्धत सुरु करण्यात आली. विशेष म्हणजे जे अधिकारी वर्षभर अवैध धंद्यांवाल्यांकडून रक्कमेच्या स्वरुपात वसुली






करतात. तेच वसुली अधिकारी आता वाटप अधिकारी झाल्याचे चित्र युवा आदर्शच्या निदर्शनास आले आहे. युवा आदर्शचे प्रतिनिधीही या संदर्भातील माहिती काढण्यासाठी वरिल केवळ पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय सोडता ईतर सर्व ठिकाणचे चित्र न्याहाळून आलेला आहे. जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधिक्षक यांच्या ही बाब निदर्शनास अद्याप पर्यंत का आली नाही? जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक साहेब हे चाललयं काय? असा संतप्त प्रश्न सूत्र संपादक मंडळींकडून उपस्थित केला जात आहे.

प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडियाचे म्हणजे पुर्वीचे आरएनआय रेजिस्टेशन प्रम ाणपत्र असलेले त्याच बरोबर महाराष्ट्र शासन मान्य यादीत सामाविष्ट असलेल्या वृत्तपत्रांना शासकीय जाहिरात दरानुसार शासकीय ठिकाणांहून अधिकृतरित्या देणे क्रमप्राप्त ठरते. शासकीय विभागाकडून जाहिरात प्रसिद्ध करतांना शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या वृत्तपत्रांचा विचार होणे महत्त्वाचे आहे. असे असले तरी पोलीस प्रशासनाला या बाबींचे काही देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे. सदर बाजार ठाण्यात ढाकणे, चंदनझिरा पोलीस ठाण्यात देशमुख, आर्थिक गुन्हे शाखेत राठोड यापद्धतीने इतर पोलीस ठाण्यातून जो येईल त्याला दिवाळीचे पाकिट देण्यात येत होते. कुणाच्या पाकिटात हजार रुपये, कुणासाठी दीड हजार रुपये, तर कुणासाठी वेगळ्या रकमेचा बंदोबस्त करुन त्यांना खुश करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. दीडशे ते दोनशे जणांना हे वाटप करण्यात आले आहे. ज्या पोलीस अधिकारी म्हणजे वाटप अधिकारी यांनी हे वाटप केलेले आहे त्यांच्या कडे त्या संदर्भातील यादी आहे.

यात महत्त्वाचे म्हणजे दीडशे ते दोनशे पाकिट वाटपाचा विचार केल्यास जवळपास एका पोलीस ठाण्यातून तीन ते पाच लाख रुपयांपर्यंचे वाटप झाले असावे असा अंदाज बांधता येईल. मुळात हे पैसे वाटप करण्यासाठी नेमके आले कुठून, वाटप अधिकाऱ्यांनी वर्षभर त्याच्या पगारीतून ही रक्कम बाजुला काढली होती की, त्या - त्या ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी यातील काही हिस्सा टाकून इतर पोलीस अधिकाऱ्यांकडून मिळून ही रक्कम जमा केली. आता खरे पाहता हे होणे शक्य नाही. मुळात ही रक्कम अवैध धंद्यांवाल्यांकडून अथवा ईतर वाम मार्गाने मिळविलेली असल्याचा दावा युवा आदर्श ठामपणे करतो आहे. कुणाकडून नेमकी रक्कम किती घेतल्या जाते हे जरी सांगता येत नसले तरी गुटखा माफीया, वाळु माफीया, सट्टा, मटका, लाल-काळा, सुरट, चक्री, लॉटरी, अवैध दारू या व यासरख्या ईतर माध्यमातून लाखोंचा मलिदा लाटण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी महोदया तसेच पोलीस अधिक्षक साहेब हे जालना शहरात काय सुरु आहे? या सर्व प्रकाराची उच्च स्तरीय चौकशी समिती स्थापन करून योग्य ती कारवाई संबंधितांवर करावी अशी मागणी सूज्ञ संपादक मंडळींमधून होत आहे.

युवा आदर्श

### दिवाळी अंक ...

बहुरंगी दिवाळी अंक
सजवला गोडबाजार
खाद्य हवे साक्षरांना
जाई बौध्दिक आजार
येतात अन् जातातही
अंक कित्येक हजार
मुश्किल कठिण कार्य
महागाई करते बेजार
असह्य रे कर्जाचा भार
मुश्किले पेलले झंजार
जाहिरात कमाईसाठी
काहींना मिळे औजार
सोपे नसे अंक काढणे
कुणा न कळे जवंजार
अंक विक्री करता मात्र
ढिली होई कधी विजार
प्रकाशित हो साहित्य
नवोदित करे वेरजार
प्रस्थापित अडेलतट्टू
प्रकाशक करे येरझार
विकत घेई अंक थोडे
त्यांचे खरे शुक्र गुजार
रद्दीलाही भाव मिळेना
प्रयत्न सगळे पिंजार
तपश्चर्या म्हणून काही
अंक काढतात पुजार
अशा प्रकाशकांना द्या
मानाचा मुजरा हजार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# दिवाळीच्या मुहूर्तावर शिवसेनेच्यावतीने पूरग्रस्त कुटुंबांना संसार उपयोगी वस्तूंचे वितरण





**जालना । प्रतिनिधी -** शिवसेनेच्या वतीने नुकतेच अतिवृष्टीमुळे जालना शहरातील नागरिकांच्या घरात पाणी घुसून प्रचंड नुकसान झाले होते. जालना शहरातील रेल्वेस्थानक परिसरात अण्णाभाऊ साठे नगर ,रहिम नगर, लक्कडकोट, बसस्टँड परिसरात आज दिपावली च्या मुहूर्तावर पूरग्रस्त कुटुंबियांना संसार उपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात आले. मा.आमदार श्री. अर्जुनरावजी खोतकर यांच्या हस्ते या वस्तूंचं वितरण करण्यात आलं. यावेळी शिवसेना जिल्हाप्रम ुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नजीर भाई फिरोज अली मौलाना, मिर्झा अन्वर बेग, संतोष चौधरी ,पांडू शेठ खैरे, सर्जेराव वाघमारे, किरण कांबळे, रितेश चौधरी नवमहालकर व कार्यकर्ते तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

पूरग्रस्त कुटुंबीयांना आवश्यक असलेल्या वस्तूंचं वितरण करण्यात आलं. हे वितरण समाजातील दुर्बल वर्गाच्या जीवनमानात सुधारणा होईल आणि त्यांच्या दिवाळीला आनंद मिळवून देईल, असं आयोजकांनी सांगितलं.

आमदार श्री. अर्जुन रावजी खोतकर यांनी आपल्या भाषणात पूरग्रस्त कुटुंबांसाठी शिवसेनेची सदैव करत असल्याचं सांगितलं. शिवसेना नेहमीच गरीब आणि दिनदुबळ्या लोकांसोबत उभ्या राहते. ही वस्त्र-भोजन वितरणाची किट तयाचाच एक भाग आहे. दिवाळीला सुख-समृद्धी आणणारी ही मदत आहे, असं ते म्हणाले.

शिवसेनेच्या या उपक्रमाने स्थानिक समाजात सकारात्मक वातावरण निर्माण केलं आहे. आणि दिवाळीच्या आनंदाला एक वेगळीच उंची दिली आहे.

# दानकुंवर महिला महाविद्यालयात एक मुलाकात नाटकाचे आयोजन

### मान्यवरांच्या उपस्थितीत होर्डिंगचे उदघाटन




**जालना । प्रतिनिधी -** दानकुंवर महिला महाविद्यालयात दिनांक २५ ऑक्टोबर रोजी सादर होणाऱ्या एक मुलाकात या नाटकाच्या होर्डिंगचे उद्घाटन शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सामाजिक जाणिवा आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचा संगम असलेले हे नाटक शहरातील प्रेक्षकांसाठी खास आकर्षण ठरणार आहे.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी नाटकाचे पोस्टर अनावरण करून कलाकारांना शुभेच्छा दिल्या. उद्घाटन प्रसंगी पूजा कक्कड (उपप्राचार्य, दानकुंवर महिला महाविद्यालय), प्रा. सौ. सुजाता अग्निहोत्री (मत्स्योदरी महाविद्यालय), सौ. सीमा कपूर (संचालिका, करिष्मा कोचिंग क्लासेस), सैफ हुसेन हसन (लेखक व दिग्दर्शक - एक मुलाकात), मंजूशेट भक्कड (अध्यक्ष, वाशिम को-ऑपरेटिव्ह बँक, जालना शाखा), राघव मिश्रा (दिल्ली प्रकाश योजना तज्ज्ञ), संजय खोतकर (उद्योगपती), धीरेंद्र मेहरा (प्रसिद्ध उद्योगपती), **पान २ वर**

# अरविंद देशमुख यांच्यासारखे सर्वसमावेशक नेतृत्व पुढे आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत-आ. खोतकर

### मराठा क्रांती मोर्चा व १८ सामाजिक संघटनांतर्फे अरविंद देशमुख यांचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या गढूळ सामाजिक वातावरणात अठरापगड जाती-पातीला सोबत घेऊन, छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार आणि कृतीचा सेतू उभारणारे सर्वसमावेशक नेतृत्व म्हणजे अरविंद देशमुख, असे गौरवोद्गार आ. अर्जुनराव खोतकर यांनी काढले. अशा सर्वसमावेशक नेतृत्वाला पुढे आणण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत,अशी ग्वाही देत अरविंद देशमुख यांना स्वीकृत सदस्य म्हणून महापालिकेत प्रतिनिधित्व देण्याबाबत विविध सामाजिक संघटनाच्यावतीने मराठा सेवा संघाचे सोपानराव तेलगड केलेल्या मागणीच्या अनुषंगाने बोलताना आपली काही अडचण आणि हरकत नाही. भाजपाचे भास्करराव दानवे यांनीही यासाठी आपला अधिकार वापरावा, असे सूचक वक्तव्य त्यांनी केले.

अखिल भारतीय म राठा महासंघाच्या विभागीय सरचिटणीसपदी निवड झाल्याबद्दल अरविंद बाळासाहेब देशमुख यांचा रविवार दि. १९ ऑक्टोबर रोजी मराठा सेवा संघ कार्यालयात मराठा क्रांती मोर्चा आणि विविध सामाजिक संघटनांच्यावतीने आयोजित सत्कार समारंभात आ. खोतकर बोलत होते. व्यासपीठावर सत्कारमूर्ती अरविंद देशमुख यांच्यासह शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, भाजपाचे महानगर अध्यक्ष भास्करराव दानवे, मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखे, राजेश राऊत, मराठा सेवा संघाचे प्रा. सोपानराव तेलगड, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, ज्येष्ठ समाजसेवी इकबाल पाशा, अंकुशराव राऊत, पंडितराव भुतेकर, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, डॉ. जगन्नाथ खंडागळे, जिल्हा बाल व स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गवारे, जगन्नाथ काकडे, संतोष गाजरे, इब्राहिम शेख, किशोर गरदास, राजेंद्र जाधव आदींची उपस्थिती होती.

आ. खोतकर पुढे म्हणाले की, अरविंद देशमुख हे फक्त म राठा समाजाचे कार्यकर्ते नाहीत, तर ते समाजातील **पान २ वर**



# संपादकीय

पान

## दिवाळी - शेतकऱ्यांच्या आयुष्यात उजेड आणणारी ठरो!

यंदाचा हंगाम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी परीक्षेचा ठरला. अवकाळी पाऊस, ढगफुटीसदृश अतिवृष्टी, नद्यांचे पूर आणि पिकांचे झालेले मोठे नुकसान - या सर्वांनी शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल पाण्यात गेले. अनेकांच्या घरांतील दिवाळीचा आनंद हरवला. तरीही आशेचा दिवा तेवत ठेवणारा हा शेतकरीच या राज्याचा आत्मा आहे. दिवाळी हा केवळ आनंदाचा सण नाही, तर नवउमेद, नवचैतन्य आणि नवसंजीवनी देणारा पर्व आहे. अंधारावर प्रकाशाचा विजय हा संदेश देणारा हा सण या वर्षी शेतकऱ्यांच्या जीवनातही नवा प्रकाश घेऊन येवो, अशीच सर्वांची मनापासून प्रार्थना आहे. शासन व समाज या दोघांनी मिळून या संकटग्रस्त शेतकऱ्यांना आधार देणे ही काळाची गरज आहे. आर्थिक मदतीबरोबरच मानसिक पाठबळ, प्रोत्साहन आणि सहकार्य या दिवाळीत त्यांना सर्वाधिक आवश्यक आहे. दिवाळी म्हणजे कुटुंब, नाती, संस्कार आणि स्नेह यांचा उत्सव. मात्र या उत्सवात अति खर्च, मोठे आवाज आणि धुराने भरलेले फटाक्यांचे वातावरण या सणाची शांतता आणि सौंदर्य हिरावून नेते. फटाके वाजवताना सावधानता बाळगणे, लहान मुलांवर लक्ष ठेवणे आणि पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. या वर्षीची दिवाळी शेतकऱ्यांसाठी आणि सर्व समाजघटकांसाठी दुःखावर मात करणारी, नव्या आशा निर्माण करणारी आणि समृद्धीकडे नेणारी ठरो. शेतकऱ्यांच्या मेहनतीतूनच आपले अन्न तयार होते, त्यांच्या अंगावरचा कष्टाचा ओघळ प्रत्येक थेंब आपल्याला उज्ज्वल भवितव्य देतो - याची जाणीव ठेवून या दिवाळीत आपण प्रत्येक घरात आणि प्रत्येक शेतात उजेडाचा किरण पोहोचवूया. युवा आदर्शच्या सर्व वाचक, जाहिरातदार, हितचिंतकांना सुख, समृद्धी आणि सुरक्षिततेने भरलेली प्रकाशमय दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील



असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील १३ कोटी जनता देवाजवळ करत आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू. मानवतेचा दिप लावू!

**श्याम ठाणेदार, दौंड पुणे**
**९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## दानकुंवर महिला ...

ॲड. अनुराग कपूर, निलेश कक्कड (अध्यक्ष, खत्री युवा संघ), प्राचार्य गणेश अग्निहोत्री (जे.ई.एस. महाविद्यालय) व संजय देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

लेखक-दिग्दर्शक सैफ हुसेन हसन यांनी या प्रसंगी नाटकाची संकल्पना सांगताना सांगितले की, एक मुलाकात हे नाटक मानवी नात्यांतील भावनिक संघर्ष, संवादाची ताकद आणि अंतर्मुख करणाऱ्या अनुभवांची कथा सादर करणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंजूशेट भक्कड होते. त्यांनी नाटकास शुभेच्छा देत सांगितले की, अशा उपक्रमांमुळे जालना शहरातील सांस्कृतिक चळवळीला नवे बळ मिळते.

पूजा कक्कड यांनी विद्यार्थिनींना सांस्कृतिक उपक्रमांत सहभाग घेण्याचे महत्त्व पटवून दिले. सौ. सीमा कपूर यांनी तरुण पिढीत कलाविष्काराची आवड जागवण्यासाठी अशा नाटकांचे आयोजन प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुजाता अग्निहोत्री यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री निलेश कक्कड यांनी केले.

एक मुलाकात हे नाटक २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सादर करण्यात येणार असून, जालन्यातील रसिकांसाठी हा एक संस्मरणीय सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे.

## अरविंद देशमुख ...

प्रत्येक घटकासाठी लढणारे कार्यकर्ते आहेत. त्यांनी सामाजिक चळवळीसह क्रीडा क्षेत्रातही विशेष ठसा उमटवला आहे. त्यांच्या सत्काराचा अर्थ म्हणजे समाजाने एका अथक योद्ध्याच्या पाठीवर प्रेमाची थाप दिली आहे. भास्करराव दानवे म्हणाले, अडचणीच्या काळात धावून जाणारा, लोकांसाठी नेहमी उपलब्ध असणारा कार्यकर्ता म्हणजे अरविंद देशमुख. भास्करराव आंबेकर म्हणाले, राजकारणात चिखल निर्माण झाला असला, तरी अरविंद देशमुख हे त्या गढूळ वातावरणात दीपस्तंभासारखे आहेत. समाजाला योग्य दिशा दाखवणारे असे व्यक्तिमत्व दुर्मीळच असते. डॉ. संजय लाखे यांनी म्हणाले की, फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारावर आधारित सामाजिक वीण पुन्हा जोडण्याचे कार्य देशमुख करत आहेत. अठरापगड जातीला एकत्र आणून त्यांनी समाजाला बळ दिले आहे. यावेळी सोपानराव तेलगड, राजेश राऊत, अनंत कुलकर्णी आदी मान्यवरांनी अरविंद देशमुख यांच्या सामाजिक चळवळीतील कार्याचा गौरव केला.

सत्काराला उत्तर देताना अरविंद देशमुख भावनिक झाले. ते म्हणाले, स्व. अण्णासाहेब पाटील यांनी १९८० साली हमाल-मापाडी आणि अठरापगड जातीला न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांचे प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी मराठा महासंघाची स्थापना केली. त्यांच्या शिकवणीप्रमाणेच आपण आणि सहकारी कार्य करीत आहे. आज या सन्मानामुळे माझ्या घरच्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या प्रेमाची ऊब जाणवली. मी कुठल्याही परिस्थितीत मराठा महासंघाचे समाजकार्य सोडणार नाही. राष्ट्रीय पातळीवरील जबाबदारीचा उपयोग मी सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठीच करणार आहे. खुर्ची मिळाली तरी मराठा महासंघ कधीच सोडणार नाही, ही माझी शपथ आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडूळ यांनी केले. त्यांनी सांगितले की, अरविंद देशमुख यांची मराठा महासंघातील कारकीर्द तब्बल २२ वर्षांची असून, गेली १७ वर्षे ते अध्यक्षपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांच्यामुळेच आज माझी ओळख असून माझे ते सामाजिक गुरु आहेत, असे ते म्हणाले.

या प्रसंगी तब्बल १८ सामाजिक आणि सर्वधर्मीय संघटनांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे दिव्यांग बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशमुख यांनी त्यांच्या हक्कांसाठी वेळोवेळी आवाज उठवून दिल्याबद्दल त्यांनी या कार्यक्रमात कृतज्ञतेने शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय देठे यांनी केले, तर शेवटी उपस्थितांचे आभार शुभम टेकाळे यांनी मानले. संपूर्ण जालना जिल्ह्यातून मराठा समाज बांधव, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला.

# अभ्यंगस्नान

गुढीपाडवा, दिवाळी इत्यादी सणांना 'अभ्यंगस्नान' करावे असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. या लेखात आपण 'अभ्यंगस्नान' म्हणजे काय, त्याची प्रत्यक्ष कृती, त्याने होणारे लाभ, अभ्यंगस्नानात तेल लावण्याचे महत्त्व सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून पहाणार आहोत.

अभ्यंगस्नान : अर्थ

अ. अभ्यंगस्नान म्हणजे पहाटे उठून डोक्याला आणि शरिराला तेल लावून नंतर कोमट पाण्याने स्नान करणे

आ. शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरविणे आणि नंतर ऊन (गरम) पाण्याने स्नान करणे म्हणजे अभ्यंगस्नान.

इ. पिंडाच्या अभ्युदयासाठी केलेले स्नान म्हणजेच अभ्यंगस्नान

वर्षभरात अभ्यंगस्नान करण्याचे दिवस

अ. संवत्सरारंभ

आ. वसंतोत्सवाचा प्रारंभ दिवस म्हणजे फाल्गुन कृष्ण प्रतिपदा

इ. दिवाळीचे तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी अर्थात नरक चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा.

अभ्यंगस्नानात तेल लावण्याचे महत्त्व

अभ्यंगाने, म्हणजेच स्नानापूर्वी तेल लावण्याने पिंडातील चेतनेतील प्रवाहाला अभंगत्व, म्हणजेच अखंडत्व प्राप्त होते. स्नानापूर्वी देहाला तेल लावल्याने पेशी, स्नायू आणि देहातील पोकळ्या जागृत अवस्थेत येऊन पंचप्राणांना कार्यरत करतात. पंचप्राणांच्या जागृततेमुळे देहातील टाकाऊ वायू ढेकरा, जांभया इत्यादींद्वारे बाहेर पडतात. यामुळे देहातील पेशी, स्नायू आणि अंतर्गत पोकळ्या चैतन्य ग्रहण करण्यात संवेदनशील बनतात. हा टाकाऊ वायू किंवा देहात घनीभूत झालेली उष्ण टाकाऊ ऊर्जा कधी कधी लहरींच्या रूपात डोळे, नाक, कान आणि त्वचेची रंध्रे यांतून बाहेर पडते; म्हणून तेल लावून झाल्यावर कधी कधी डोळे आणि मुख (चेहरा) लाल होतो.'

अभ्यंगस्नान केल्याने होणारे लाभ

अ. अभ्यंगस्नानामुळे होणारे शारीरिक लाभ : त्वचेला नेहमी स्निग्धता असावी लागते, म्हणून तेल लावतात. ऊन पाणी हे मंगल आणि शरीराला सुखदायक आहे; म्हणून ऊन पाण्याने स्नान करतात. तेल लावून नंतर स्नान करण्याने त्वचेला आणि केसांना आवश्यक तेवढाच ओशटपणा रहातो; म्हणून स्नानापूर्वी तेल लावणे आवश्यक आहे. स्नानानंतर तेल लावणे उचित नाही.

आ. अभ्यंगस्नानामुळे होणारे आध्यात्मिक लाभ : स्नानामुळे रज-तम गुण एक लक्षांश इतके कमी होऊन सत्त्वगुण त्याच प्रमाणात वाढतात आणि त्यांचा प्रभाव नेहमीच्या स्नानामुळे सुमारे तीन तास टिकतो, तर अभ्यंगस्नानामुळे चार ते पाच तास टिकतो. अभ्यंगस्नानाचे अन्यही बरेच आध्यात्मिक लाभ आहेत.

अभ्यंगस्नानाची कृती

तेल, उटणे आणि त्यांचे मिश्रण

व्यक्तीला प्रथम कुंकवाचा टिळा लावण्यात येतो. तिच्या अंगाला शरिराच्या वरच्या भागाकडून खालच्या भागाकडे तेल लावण्यात येते. नंतर तेल आणि उटणे यांचे मिश्रण एकत्रित करून अंगाला लावण्यात येते. मग तिला ओवाळण्यात येते. त्यानंतर तिने दोन तांबे उष्ण पाणी अंगावर घेतल्यावर तिच्यावरून आघाडा किंवा टाकळा यांची फांदी मंत्र म्हणत तीनदा फिरवतात.

दिवाळीत अंगाला उटणे लावण्याची पद्धत

दिवाळीतील अभ्यंगस्नानात उटण्याला विशेष महत्त्व आहे. उटणे अंगाला लावण्याची पद्धत कशी असावी, याचे विश्लेषण येथे देत आहोत. उटणे हे रजोगुणी तेजोमय असल्याने ते अंगाला लावतांना घड्याळाच्या काट्याच्या दिशेने बोटांच्या अग्रभागाचा अंगाला स्पर्श करून थोडेसे दाबून लावावे. प्रत्येक ठिकाणी दिलेली उटणे लावण्याची पद्धत त्या त्या पोकळीत असणार्या त्रासदायक वायूंच्या गतीला अनुसरून दिली आहे.


स्वतःला उटणे लावणे

कपाळ : कपाळावर लावतांना मधल्या तीन बोटांचा उपयोग करून स्वतः लावतांना डावीकडून उजवीकडे या पद्धतीने लावावे.

कपाळाच्या दोन्ही टोकांना बाजूला भुवईजवळ : येथे लावतांना ते बोटांच्या अग्रभागांनी डावीकडून उजवीकडे (खालून वरच्या दिशेने), तसेच उजवीकडून डावीकडे (वरून खालच्या दिशेने) चोळून लावावे.

डोळ्यांच्या पापण्या : यांवर लावतांना नाकाकडून कानाकडे हात फिरवावा.

नाक : याला लावतांना उजव्या हाताच्या अंगठा आणि तर्जनी यांनी नाकाच्या दोन्ही बाजूंनी खालच्या दिशेने उतरत यावे अन् खाली आल्यावर उटण्याचा वास घ्यावा. उटण्याच्या वासातून प्रक्षेपित होणारा तेजाशी संबंधित गंध फुफ्फुसांतील वायूकोषात गेल्याने तेथील काळे आवरण नष्ट होण्यास साहाय्य होते.




मुखाचा वरचा भाग : या भागातून, म्हणजेच नाकाच्या खालून मधली तीन बोटे ठेवून आरंभ करून घड्याळाच्या काट्याच्या दिशेने मुखाभोवती गोल, म्हणजेच हनुवटीच्या खड्ड्यातून वर स्वतःच्या डावीकडे जाऊन मुखाभोवतीचा गोल पूर्ण करावा.

गालांच्या पोकळी : गालाच्या मध्यभागातून आरंभ करून घड्याळाच्या काट्याप्रमाणे बोटांची अग्रे गोल गोल फिरवून लावावे.

कानाची पाळी : ही तर्जनी आणि अंगठा यांमध्ये धरून तिथल्या तिथे हलवून उटणे लावावे.

दोन्ही कान : दोन्ही कान हातांनी पकडून कानाच्या मागच्या बाजूला फक्त अंगठा ठेवून खालून वरच्या दिशेने फिरवावा.

मान : मानेच्या मागून मध्यातून दोन्ही हातांची बोटे पुढे विशुद्ध चक्राकडे आणणे

छाती आणि पोट यांचा मध्यभाग : उजव्या हाताच्या तळव्याने छातीच्या मध्यरेषेवर वरून खालच्या दिशेने नाभीकडे हात फिरवत आणणे.

काखेपासून कमरेपर्यंत : काखेपासून पितृतीर्थासारखा हात, म्हणजेच अंगठा एका बाजूला अन् चार बोटे दुसर्यामबाजूला ठेवून अंगाच्या दोन्ही बाजूच्या रेषेवरून वरून खाली या पद्धतीने फिरवावेत.

पाय आणि हात : हाताची बोटे फिरवत पायांवर आणि हातांवर वरून खालच्या दिशेने उटणे लावावे.

पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषा : पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषेवर अंगठा अन् तर्जनी यांनी विळखा घालून तो भाग कड्यासारखा घासावा.

डोक्याच्या मध्यभागी : डोक्याच्या मध्यभागी तेल लावून ते हाताने घड्याळाच्या काट्याप्रमाणे फिरवावे.

आ. दुसर्या व्यक्तीला उटणे लावणे

पाठ : दुसऱ्या व्यक्तीच्या पाठीला उटणे लावतांना पाठीच्या मणक्याच्या रेषेशी दोन्ही हातांच्या बोटांची अग्रे येतील अशा पद्धतीने वरून खालच्या दिशेने दोन्ही हात एकाच वेळी फिरवावेत.

कंबर : दुसर्या व्यक्तीला लावतांना कमरेच्या आडव्या रेषेवर पाठीकडून तिच्या डाव्या बाजूकडून उजवीकडे येऊन परत उजवीकडून डावीकडे जावे. असे परत परत लावावे.

अ. देशकालकथन

अभ्यंगस्नान करतांना देशकालकथन करावे लागते.

आ. देशकालकथनाचे महत्त्व

ब्रह्मदेवाचा जन्म झाल्यापासून आतापर्यंत ब्रह्मदेवाची किती वर्षे झाली; कोणत्या वर्षातील कोणते आणि कितवे मन्वंतर चालू आहे; या मन्वंतरातील कितवे महायुग आणि त्या महायुगातील कोणते उपयुग चालू आहे, या सर्वांचा उल्लेख देशकालकथनात असतो. यावरून यापूर्वी केवढा मोठा काळ गेला आहे आणि राहिलेला काळही केवढा मोठा आहे, याची कल्पना येते. 'आपण फार मोठे आहोत', असे प्रत्येकाला वाटत असते; पण 'आपण किती लहान तथा सूक्ष्म आहोत', याची कल्पना या विश्वाच्या अफाट काळावरून येते. यामुळे माणसाचा गर्व नाहीसा होतो.'

**संदर्भ : सनातन संस्थेचे ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते' आणि 'दिनचर्येशी संबंधित आचार आणि त्यांमागील शास्त्र'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**

**संपर्क- ९२८४०२७१८०**

# अवैध गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थाची मोठी खेप जप्त; ८७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## कल्याण गुन्हे शाखा, युनिट-३ ची धडक कारवाई

**कल्याण । प्रतिनिधी -** ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा, युनिट ३ (कल्याण) पथकाने एक मोठी कामगिरी बजावत गुजरात राज्यातून महाराष्ट्रात आणल्या जाणाऱ्या अवैध गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या वाहतुकीवर कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल रु ८७,३७,४७२ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

गुन्हे शाखा, युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गुजरात राज्यातून आयशर टेम्पो द्वारे प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक करून महाराष्ट्रात विक्रीसाठी आणली जात आहे. या माहितीच्या आधारे १७ ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटे साडेपाच वाजता गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने गांधारी ब्रिज चौक, कल्याण (पश्चिम) येथे सापळा रचला.

या कारवाईत पोलिसांनी धनराज रामगोपाल स्वामी (वय अंदाजे ३५ वर्षे, रा. वॉर्ड क्र. १३, लालासी, ता. लक्ष्मणगड, जि. सिकर, राजस्थान) यास अटक केली. त्याच्याकडून आयशर टेम्पो, त्यातील अवैध गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ असा एकूण ८७ लाख ३७ हजार ४७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास गुन्हे शाखा, कल्याणचे अधिकारी करत आहेत.


सदर कारवाई पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. पंजाबराव उगले, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री. अमरसिंह जाधव, तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) श्री. शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, पोलीस उपनिरीक्षक विनोद पाटील, पोलीस उपनिरीक्षक किरण भिसे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले, बालाजी शिंदे, तसेच पोलीस हवालदार बोरकर, सुधीर कदम, विजय जिरे, प्रशांत वानखेडे, सचिन भालेराव, गोरक्षनाथ पोटे, विलास कडू, आदिक जाधव, पांडुरंग भांगरे, उल्हास खंदारे, सचिन कदम, प्रविण किनरे, दिपक महाजन, मिथुन राठोड, सतिश सोनवणे, गुरुनाथ जरग, विनोद बन्ने, गणेश हरणे व गोरक्ष शेकडे यांनी विशेष परिश्रम घेतले. गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे कल्याण परिसरात अवैध गुटखा वाहतुकीवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ठाणे शहर पोलीस आयुक्तांनी या पथकाचे कौतुक केले असून पुढील तपास सुरू आहे.




# जाफराबाद तालुक्यातील भोगगाव जिल्हा परिषद शाळेला ५३ हजारांचे साहित्य भेट

## युगंधर प्रतिष्ठानचा उपक्रम



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** घनसावंगी तालुक्यातील पूरग्रस्त गाव भोगगाव येथील जिल्हा परिषद शाळेला टेंभुर्णी ता. जाफराबाद येथील युगंधर प्रतिष्ठानच्या माध्यमातून ५३ हजाराचे शालेय साहित्य भेट देण्यात आले.अतिवृष्टी आणि पुरामुळे भोगाव येथील जिल्हा परिषद शाळेचे,इमारतीचे अन्य साहित्याचे मोठे नुकसान झाले होते.सामाजिक संवेदना जपून कायम कार्य करणाऱ्या युगंधर प्रतिष्ठानच्या वतीने सोशल मीडियाच्या माध्यमातून मदतीचे आवाहन करण्यात आले होते.या आवाहनातून संकलित झालेल्या ५३ हजाराच्या माध्यमातून या शाळेसाठी २ स्मार्ट अँड्रॉइड ४२ इंची टीव्ही,२ कपाट,६खुर्च्या आणि १७३ विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन रजिस्टर (४४डझन) हे साहित्य भेट देण्यात आले.यावेळी आयोजित कार्यक्रमास जाफराबाद पंचायत समितीचे विस्तार अधिकारी रामकुमार खराडे,युगंधर प्रतिष्ठान चे अध्यक्ष विनोद कळंबे,ह.भ.प.नारायण पिंपळे, सुनील जोशी, ज्ञानेश्वर मुळे,उद्धव मुळे,दादासाहेब मुळे, वामन मुळे, सुरेश उबाळे, सुनिल शिंदे,नंदकिशोर मोरे,संभाजी ढाकणे, ऋषिकेश भोसले,निलेश गायके यांच्यासह भोगगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करून लॉयन्सने उजळवला माणुसकीचा दीप

**जालना । प्रतिनिधी -** दिवाळीचा आनंद साजरा करण्यासोबतच समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या हातांचा गौरव करण्याचा प्रेरणादायी उपक्रम लायन्स क्लब ऑफ परतूर व दृष्टी लायन्स नेत्रालय, परतूर-जालना यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत परतूर नगरपरिषदेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांचा दिवाळीच्या पूर्वसंध्येला रविवार दि. १९ ऑक्टोबर रोजी सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी स्वच्छता कर्मचाऱ्यांना कपड्यांचे व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. आपल्या मेहनतीमुळेच शहराचा प्रत्येक कोपरा उजळतो. या हातांना सन्मान देणे, हेच आमचे खरे सामाजिक कर्तव्य आहे, शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेणाऱ्या या कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लॉ. अतुल लड्डा होते. प्रमुख अतिथी म्हणून परमेश्वर राजबिंडे, मनोहर खालापुरे, प्रवीण जेथलिया, महेश होलाणी, विश्वंभर दहिवाल, प्रशांत मसलकर, गणेश बोराडे, लक्ष्मीकांत बहिवाल, भानुदास कदम, शिल्पा होलाणी, संजीवनी खालापुरे, रोहिणी बहिवाल, सुनिता बोराडे तसेच नगरपरिषदेचे स्वच्छता कर्मचारी बांधव आणि लायन्स क्लब सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लायन्स क्लब परतूरचे ज्येष्ठ सदस्य स्व. भास्करराव खोसे =यांच्या निधनाबद्दल सर्व सदस्यांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली.

या उपक्रमासाठी सर्व लायन्स सदस्यांनी परिश्रम घेतले. सामाजिक जाणिवेतून घेतलेला हा सन्मान सोहळा 'स्वच्छतेच्या योद्ध्यांप्रती कृतज्ञतेचा दीप प्रज्वलित करणारा ठरला.







# दिवाळीनंतर नगर पालिकांच्या निवडणुका?

## जिल्हापरिषदेचा नंबर नंतर!

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल लवकरच वाजणार आहे, असा अंदाज आहे. मात्र, निवडणुका कोणत्या क्रमाने होतील याबाबत राज्यात संभ्रम निर्माण झाला आहे.

यावर पालकमंत्री व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगाव येथे स्पष्ट केले आहे. राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुका आधी घेण्यात येणार आहेत, तर जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचा विचार नंतर केला जाईल. त्यामुळे नगर पालिकांच्या निवडणुका ह्या दिवाळीनंतर केव्हाही जाहीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यानंतरच जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे.

भाजपा व शिवसेना (शिंदे) हे सद्या सत्तेत आहेत. आणि त्यांची युती आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत ही युती ठेवली जाईल की नाही हे स्थानिक पातळीवर ठरणार असल्याचे सुतोवाचही गुलाबराव पाटील यांनी दिले आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी स्थानिक पातळीवर पदाधिकारी कार्यकर्त्यांनी स्वबळाचा नारा दिला व प्रभावी उमेदवार दिल्यास त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीचा मार्ग मोकळा झाल्याचे चिन्ह आहे. गुलाबराव पाटील यांच्या वक्त्याचा विचार करता जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद आणि महानगर पालिका निवडणुकीत आता भाजपा आणि शिवसेना (शिंदे) हे युती करतात की नाही याबाबत शंका निर्माण झाली आहे. या ठिकाणी काँग्रेसचे प्रभावी नेते माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी भाजपात प्रवेश केला आहे. त्यामुळे भाजपाने स्वबळाचा नारा त्यांनी प्रवेशादरम्यानच दिला होता. आता गुलाबराव पाटील यांच्या वक्तव्यामुळे यावर शिक्कामोर्तब होण्याची चिन्हे आहे. त्यामुळे जालना महानगर पालिका निवडणुक मोठी अटीतटीची होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाजपा, शिवसेना दोन्ही गट, राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही गट, काँग्रेस यांच्यासह आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, बसपा, मनसे व इतर छोट्या-मोठ्या पक्षांची नेमकी भूमिका काय ठरते यावर सर्व गणित अवलंबून आहे. मात्र, महापौर पदासाठी जवळपास चार दिग्गज उमेदवार उभे राहण्याची शक्यता आहे.





## खरेदीसाठी नागरिकांची गर्दी

**जालना-** दिवाळी सणाची चाहूल लागताच जालना शहरासह परिसरातील बाजारपेठा ग्राहकांनी फुलून गेल्या आहेत. सणाच्या खरेदीसाठी महिलांचा, पुरुषांचा आणि लहान मुलांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. विशेषतः कपड्यांच्या दुकानांमध्ये पसंतीचे ट्रेंडी व पारंपरिक कपडे खरेदी करण्यासाठी ग्राहकांची झुंबड उडाल्याचे चित्र दिसत आहे. शनिवार-रविवारच्या सुट्टीचा फायदा घेत अनेक कुटुंबे बाजारात खरेदीसाठी गर्दी करत असून, शहरातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर, स्टेशन रोड आणि नवीन मोंढा भागात प्रचंड वर्दळ पाहायला मिळत आहे. दिवाळीच्या पारंपरिक पोशाखांपासून ते आधुनिक डिझाइनच्या कपड्यांपर्यंत, सर्व वयोगटातील ग्राहक आपापल्या आवडीचे कपडे निवडताना दिसत आहेत.

# भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये हे अमेरिका ठरविणारा कोण?

आंतरराष्ट्रीय संबंध कसे टिकवायचे आणि कोणासोबत टिकवून ठेवायचे याची जाणीव भारताला चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला कोणत्याही प्रकारचा आंतरराष्ट्रीय सल्ला देवू नये.अमेरिकेला जर चांगला सल्ला पाहिजे असेल तर त्यांनी भारताजवळुन घ्यावा त्याचे भलेच होईल.ट्रम्प म्हणाले की ब्रेकिंग न्यूज देऊ का?भारत रशियाचे तेल घेणे थांबवणार! परंतु असे काहीच नाही.कारण डोनाल्ड ट्रम्प यांचे दररोज देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत विवादास्पद आणि बिनबुडाचे बयान येत असतात यात काही नवीन नाही किंवा तथ्य नाही.त्याच पध्दतीचा भारत-रशिया तेल धोरणाबद्दल ट्रम्प स्वतःची पाठ थोपटणारे वक्तव्य केले आहे.जगातील अनेक देशांना कल्पना आहे की अमेरिका केव्हा व कधीही कोणालाही धोका देवू शकतो.त्यामुळे आजच्या परिस्थितीत अमेरिका व खासकरून डोनाल्ड ट्रम्प विश्वास पात्र रहाले नाही.जगाला कल्पना आहे की नोबेल शांती पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प प्रत्येक देशाच्या दारोदारी फिरत होते व मला नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी संपूर्ण शक्तीनिशी दबावतंत्राचा वापर करीत होते. परंतु संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले.नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प पाकिस्तानसमोर झुकले सुध्दा.परंतु नोबेल शांती पुरस्कारांपासून डोनाल्ड ट्रम्पला कोसो दूर फेकल्या गेले. अशाप्रकारे ट्रम्पची पुरस्काराची कथा,प्रथा,व्यथा संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली आणि त्यांच्या आशा आकांक्षा संपूर्ण धुळीस मिळाल्या.कोणताही पुरस्कार असो मागावा लागत नाही, मिळवावा लागतो यासाठी त्या पध्दतीची प्रतीमा तयार करावी लागते व मेहनत करावी लागते आणि कोणताही पुरस्कार हे मेहनतीचे फळ असते.ज्यांचे नाव कधी चर्चेत नव्हते त्या दक्षिण अमेरिका खंडातील व्हेनेझुएलाम ध्ये लोकशाहीला प्रोत्साहन आणि हुकुमशाहीच्या विरोधात लढण्यासाठी विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला.मारिया कोरिना मचाडोला हा मिळालेला पुरस्कार त्यांच्या कर्तृत्वाच्या काम गिरीवर मिळाला आहे आणि नोबेल पुरस्काराच्या शर्यतीत धावणाऱ्या ट्रम्पची हवा गुल होऊन चारोकोणे चीत झाले. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या कोणत्याही वक्तव्याकडे किंवा भाष्याकडे भारतासह कोणताही देश बारकाईने लक्ष देत नाही. रशिया व भारत असा देश आहे की जसा शब्द देतो तसा पाळतो सुध्दा आणि दिलेला प्रत्येक शब्द काळ्यापाटीवरील पांढरी रेष असते.त्यामुळे भारताने तेल रशिया जवळुन खरेदी करावे की नाही ही भारत-रशियाची विदेश निती ठरवित असते.त्यामुळे रशियाच्या बाबतीत अमेरिकेने कितीही दबाव तंत्राचा वापर केला तरी भारत-रशिया संबंध यत्किंचितही डगमगणार नाही ही बाब ट्रम्पने लक्षात ठेवली पाहिजे.कारण संपूर्ण जगाला चांगल्याप्रकारे ग्यात आहे की ट्रम्प काय आहे.ट्रम्पच्या अनेक चुकीच्या निर्णयामुळे अमेरिका अडचणीत आला आहे व डोनाल्ड ट्रम्प स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक देशांना धोका देऊन त्यांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडले याचे अनेक उदाहरण जगापुढे आहेत. अमेरिकेतील विदेशी नागरिकांनी ट्रम्पच्या विरोधात जात आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने नव्या एच १बी व्हिसा फीचे शुल्क एक लाख डॉलर (सुमारे ८८ लाख रुपये) इतके वाढविल्याच्या निर्णयावर यूएस चेंबर ऑफ कॉमर्सने कोलंबिया येथील न्यायालयात सरकारविरोधात खटला दाखल केला आहे.यावरून स्पष्ट होते की ट्रम्प प्रशासनाचा निर्णय दिशाहीन असून बेकायदेशीर आणि मनमानीवाला आहे,असा दावा याचिकेत केला आहे आणि ही बाब सत्य आहे.अशाच चुकीच्या निर्णयाची पुनरावृत्ती भारत-रशिया संबंधांच्या बाबतीत ट्रम्प करीत आहे. युक्रेन-रशिया युध्द संपविण्याच्या उद्देशाने डोनाल्ट ट्रम्प म्हणतात, भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही असे आश्वासन भारताचे पंतप्रधान व माझे मित्र नरेंद्र मोदी यांनी मला दिले असल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १५ आक्टोंबरला केला.खरे पहाले तर भारताने अशा पद्धतीचे कोणतेही पाऊल उचलले नाही आणि उचलणार सुध्दा नाही.कारण भारताने रशियाला व रशियाने भारताला अनेक संकटकाळीन परिस्थितीत दोघांनी एकमेकांना मदत व सहाय्यता केली आहे आणि अमेरिकेचा विचार केला तर अमेरिकेने नेहमीच पाकिस्तानला मदत करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या वक्तव्यावरून स्पष्ट लक्षात येते की त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे.आंतराष्ट्रीय बाजारात रशियाचे तेल आजही सर्वात स्वस्त, किफायतशीर आहे आणि रशियाचे भारतासोबतचे ऊर्जा संबंध हे भारताच्या राष्ट्रीय हिताशी सुसंगत आहेत. जागतिक बाजारात रशियापुढे अमेरिकेने अनेक अडथळे आणले गेले परंतु त्यांना न जुमानता, रशियाने सातत्याने बांधिलकी जपली.तसेच पर्यायी पुरवठा साखळी व पेमेंट सिस्टीममध्ये देखील लवचिकता दाखविली.रशियासारखे धाडस अमेरिकेत अजीबात नाही ही बाब स्पष्ट दिसून येते. ट्रम्पच्या वक्तव्यानंतर भारताची रशियातून तेल खरेदी जोमाने वाढली असून अमेरिकेच्या धमक्यांचा तेल खरेदीवर तिळमात्र परिणाम आलेला नाही. सध्याच्या परिस्थितीत अमेरिकेने फसव्या योजनांना सुरूवात केली आहे यात पॅलेस्टाईन- इजरायल संघर्ष ट्रम्प यांची फसवी योजना असल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे रशियाच्या तेलावरून भारताच्या बाबतीत ट्रम्पने टाकलेला तेल बॉम्ब फुस्सी निघाल्याचे स्पष्ट दिसून येते.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार) मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# प्रणवी भिसेचे संस्कृत स्पर्धेत यश

जालना : शहरातील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय, श्रीराम संस्कृत विद्यालय, अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संस्कृत लक्ष्मी स्त्रोत्रम स्पर्धेत प्रणवी राजेश भिसे हिने घवघवीत यश संपादित केले आहे. डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन व शालेय संस्कृत स्पर्धा-२०२५ पारितोषिक वितरण सोहळ्यात पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी इयत्ता ६ वी ते १० वी च्या प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ ३३ विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. तिच्या या यशाबद्दल श्रीराम वाचनालयाचे श्याम शेलगावकर, श्रीकांत शेलगांवकर, शैलेंद्र बदनापूरकर, सतीश नरवडे यांच्यासह अनेकांनी कौतुक केले आहे.

# मुक्त विद्यापीठाचा अप्रेंटिसशिप बोर्ड सोबत सामंजस्य करार; दोन नवीन शिक्षणक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग प्रशिक्षणाची संधी

**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत कार्यरत बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंगचा (BOT - बोट ) पश्चिम विभाग यांनी विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षणाच्या नव्या संधी खुल्या केल्या आहेत. मंगळवारी दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबई येथे या दोन्ही संस्थांमध्ये या संदर्भात सामंजस्य करार (चेण) करण्यात आला. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली यासंदर्भात विशेष पूर्वतयारी व नियोजन करण्यात आले होते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एनईपी - २०२०) नुसार पदवी शिक्षणक्रमात प्रत्यक्ष कार्यस्थळी प्रशिक्षण (ऑन-जॉब ट्रेनिंग) आणि संबंधित प्रकल्पांना प्रोत्साहन दिले जात आहे. त्यानुसार मुक्त विद्यापीठाने बीबीए (पोर्ट मॅनेजमेंट) आणि बी.एस्सी. (इंडस्ट्रिअल ऑटोमेशन) हे दोन अप्रेंटिसशिप एम्बेडेड शिक्षणक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर शिक्षणक्रम आणि झालेला सामंजस्य करार यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच उद्योग क्षेत्रात कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

याप्रसंगी बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी नाशिक येथील विद्यापीठ आवारात बोर्ड ऑफ अप्रेंटिसशिप ट्रेनिंगचे सहाय्यता केंद्र सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. या माध्यमातून महाराष्ट्रभरातील विद्यार्थ्यांना उद्योग प्रशिक्षण आणि रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध होतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. बोर्डाच्या वतीने संचालक पी. एन. जुमले यांनी बोर्डाच्या विविध योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मुक्त विद्यापीठाबरोबर संयुक्तपणे काम करण्याची तयारी दर्शवली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची भावना वाढावी यासाठी बोर्डाचे अधिकारी सदर अभ्यासकेंद्रांमध्ये मार्गदर्शन सत्रे घेतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यापीठाचे वित्त अधिकारी व प्रभारी कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, संगणकशास्त्र विद्याशाखेचे संचालक श्री. माधव पळशीकर, महाज्ञानदीपचे प्रमुख प्रा. गणेश लोखंडे, ग्रामीण विकास व उद्योजकता विभागाचे प्रमुख प्रा. कैलास मोरे यांच्यासह बोर्डाचे उपसंचालक श्री. एन. एन. वडोदे, सहाय्यक संचालक डॉ. प्रविण उके, श्री. व्ही. व्ही. देशमुख आणि श्री. एन. सी. गांगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नरक चतुर्दशीचे महत्त्व आणि अध्यात्मशास्त्र

आश्विन वद्य चतुर्दशीला नरकासुर राक्षसाच्या वधाप्रित्यर्थ दिवाळीतील या सणाच्या दिवशी पहाटे सूर्योदयापूर्वी उठून अभ्यंगस्नान केले जाते. या दिवशी यम दीपदान करून ब्राह्मणांना भोजन आणि वस्त्रांचे दानही दिले जाते. या सणाचे महत्त्व आणि या दिवशी करण्यात येणाऱ्या कृतींमागील शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून पहाणार आहोत.

इतिहास : ‘श्रीमद्भागवतपुराणात अशी एक कथा आहे - पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे भौमासुर किंवा नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो फार पीडा देऊ लागला. हा दुष्ट दैत्य स्त्रियांना पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना कारागृहात कोंडून ठेवले आणि त्यांच्याशी विवाह करण्याचा बेत केला. त्यामुळे जिकडेतिकडे हाहाःकार उडाला. श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच सत्यभामेसह त्याने नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व राजकन्यांना मुक्त केले. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, ‘आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.’ कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही ‘नरक चतुर्दशी’ मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. चतुर्दशीच्या पहाटे नरकासुरास ठार करून त्याच्या रक्ताचा टिळा कपाळास लावून श्रीकृष्ण घरी येताच मातांनी त्याला आलिंगन दिले. स्त्रियांनी दिवे ओवाळून आनंद व्यक्त केला.

सण साजरा करण्याची पद्धत :

अभ्यंगस्नान - गुढीपाडवा, दिवाळी इत्यादी सणांना ‘अभ्यंगस्नान’ करावे असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. अभ्यंगस्नान म्हणजे पहाटे उठून डोक्याला आणि शरिराला तेल लावून नंतर कोमट पाण्याने स्नान करणे, शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरविणे आणि नंतर ऊन (गरम) पाण्याने स्नान करणे म्हणजे अभ्यंगस्नान. पिंडाच्या अभ्युदयासाठी केलेले स्नान म्हणजेच अभ्यंगस्नान.




आकाशात तारे असतांना ब्राह्ममुहूर्तावर अभ्यंगस्नान करतात. आघाडा या वनस्पतीच्या फांदीने डोक्यापासून पायापर्यंत आणि पुन्हा डोक्यापर्यंत पाणी प्रोक्षण करतात. यासाठी मूळ असलेली आघाड्याची वनस्पती वापरतात. आघाडा वनस्पती उपलब्ध न झाल्यास देवाला प्रार्थना करून स्नान करावे. व्यक्तीला प्रथम कुंकवाचा टिळा लावण्यात येतो. तिच्या अंगाला शरिराच्या वरच्या भागाकडून खालच्या भागाकडे तेल लावण्यात येते. नंतर तेल आणि उटणे यांचे मिश्रण एकत्रित करून अंगाला लावण्यात येते. मग तिला ओवाळण्यात येते. त्यानंतर तिने दोन तांबे उष्ण पाणी अंगावर घेतल्यावर तिच्यावरून आघाडा किंवा टाकळा यांची फांदी मंत्र म्हणत तीनदा फिरवतात. अभ्यंगस्नासाठी उटणे उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी खोबरेल तेलात हळद घालून ते अंगाला लावावे. अभ्यंगस्नानामुळे होणारे शारीरिक आणि आध्यात्मिक लाभ - त्वचेला नेहमी स्निग्धता असावी लागते, म्हणून तेल लावतात. ऊन पाणी हे मंगल आणि शरीराला सुखदायक आहे; म्हणून ऊन पाण्याने स्नान करतात. तेल लावून नंतर स्नान करण्याने त्वचेला आणि केसांना आवश्यक तेवढाच ओशटपणा रहातो; म्हणून स्नानापूर्वी तेल लावणे आवश्यक आहे. स्नानानंतर तेल लावणे उचित नाही. स्नानामुळे रज-तम गुण एक लक्षांश इतके कमी होऊन सत्त्वगुण त्याच प्रमाणात वाढतात आणि त्यांचा प्रभाव नेहमीच्या स्नानामुळे सुमारे तीन तास टिकतो, तर अभ्यंगस्नानामुळे चार ते पाच तास टिकतो.

यमतर्पण - अभ्यंगस्नानानंतर अपमृत्यू निवारणार्थ यमतर्पण करण्यास सांगितले आहे. हा तर्पणाचा विधी पंचांगात दिलेला असतो. त्याप्रमाणे विधी करावा. त्यानंतर आई मुलांना ओवाळते. काही जण अभ्यंगस्नानानंतर नरकासुराच्या वधाचे प्रतीक म्हणून कारीट (एक प्रकारचे कडू फळ) पायाने ठेचून उडवतात, तर काही जण त्याचा रस (रक्त) जिभेला लावतात.

दुपारी ब्राह्मणभोजन घालतात आणि वस्त्रदान करतात. ब्राह्मणभोजन घालणे आणि वस्त्रदान करणे शक्य नसल्यास अर्पणाचा सदुपयोग होईल, अशा ठिकाणी किंवा धार्मिक कार्य करणार्या संस्थांना काही रक्कम अर्पण करावी.

प्रदोषकाळी दीपदान करतात. ज्याने प्रदोषव्रत घेतले असेल, तो प्रदोषपूजा आणि शिवपूजा करतो.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ ‘सण, धार्मिक उत्सव आणि व्रते’**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.